MHBI160018602022

**नियमीत दिवाणी दावा क्र.११८५/२०२२**

**अशोक वि. उमाजी व इतर**

**आदेश नि.२७ वर**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी सी.पी.सी.चे ऑर्डर २६ रूल ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त नेमणुकीबाबत देण्यात आलेला आहे. वादीने सदर अर्जास आपले म्हणणे नि.२९ वर दाखल करुन सदरील अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली आहे.

२. प्रतिवादींचे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा मालकी हक्क जाहीर करणे व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीवरील कब्जेवहिवाट नाकारली आहे. प्रतिवादींच्या मते वादीची दावा मिळकत गट नं.२५३ क्षेत्र ०.२२ आर. पैकी ०.०५ आर. जमीन पडीक असून ०.१० आर. मध्ये पाण्याचे शेततळे आहे व उर्वरित ०.०७ आर. ही जमीन नदीमध्ये गेली आहे. त्यामुळे वादीस गट नं.२५३ मध्ये क्षेत्र राहिलेले नाही. असे असताना वादीने चुकीच्या चतु:सिमा दर्शवून बनावट नकाशा आधारे दावा दाखल केला आहे. करीता, प्रतिवादींनी उपअधिक्षक भूमि अभिलेख शिरूरकासार यांच्यामार्फत वादग्रस्त मिळकतीची मोजणी होवून वादग्रस्त मिळकत अस्तित्वात आहे काय, वादीचे ताब्यात वादग्रस्त मिळकत किती आहे तसेच वादग्रस्त मिळकतीच्या चतु:सिमा कोणत्या आहेत याबाबत अहवाल मागवण्याची विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे नि.२९ कडे दाखल करुन कथन केले की, वादी हे वादग्रस्त गट क्र.२५३ क्षेत्र २२ आर. या मिळकतीचे मालक वहिवाटदार आहे. सदर गटात प्रतिवादींचा कोणताही हक्कसंबंध नाही. तसेच प्रतिवादींनी वादीचे वादग्रस्त मिळकतीवरील कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा केला आहे. यापूर्वी प्रतिवादींनी दाखल केलेला दावा

क्र.९३/२०१३ यामध्ये दि.२२.०४.२०१३ रोजी मोजणी झाली आहे. सदर मोजणीप्रमाणे प्रतिवादींनी वादीचे मिळकतीवर केलेले अतिक्रमीत क्षेत्र ६ आर. चा ताबा वादीस परत दिला आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींनी केवळ पुरावा गोळा करण्यासाठी व वादीस त्रास देण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीने सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती केली.

४. प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील म्हणणे आणि अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. वादीने प्रस्तुतचा दावा हा मालकी हक्क जाहीर होवून निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे दावा मिळकतीवरील मालकी व कब्जेवहिवाट शाबीत करण्याची जबाबदारी वादीची आहे. उलटपक्षी प्रतिवादींनी त्याचे बचावात वादीचे गट नं.२५३ पैकी १० आर. क्षेत्र शेततळे, ०५ आर. क्षेत्र नापीक आणि ०७आर. क्षेत्र नदी करीता गेल्याने वादीस गट नं.२५३ मध्ये वहिवाटीकरीता मिळकत नसल्याचा बचाव घेतला आहे. सदरचा बचाव शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादींची आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींना त्यांचा बचाव शाबीत करण्याकरीता न्यायालयीन यंत्रणेची मदत घेता येणार नाही व त्या अनुषंगे न्यायालयाच्या मदतीने प्रतिवादीस त्याचा बचाव शाबीत करता येणार नाही. प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्यास पुरावा गोळा करण्याकरीता प्रतिवादीस न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक केल्यासारखे होणार आहे. त्यामुळे प्रतिवादींच्या मागणीप्रमाणे न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करता येणार नाही. परिणामी, प्रतिवादींचा अर्ज हा मंजूर होण्यास पात्र नाही. करीता, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रतिवादींचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2024.07.19 17:32:47 +0530

**(अ.सं. जगताप)**
दिनांक १९/०७/२०२४
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरुरकासार.

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 19/07/2024 |
| Transcribed on | : | 19/07/2024 |
| Checked & signed on | : | 19/07/2024 |